स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 11–02–2013 रोजी सकाळी 11–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 3. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 4. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 5. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 6. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 7. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 8. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 9. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 10. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 11. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 12. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 3. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 4. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. संजय काकडे, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 400** :— प्रभाग क्र. 55—ब येथे एस.ए. रोड पासून करुणाभवन, श्री किरणा ते सी.बी. रोड ॲंड. सॅमुअल ते हायकोर्ट रोडचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 39,98,635/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 401** :— 1857 प्रथम स्वतंत्रता संग्राम 150 वी वर्षगांढ निमित्त गांधीबाग बगीचा येथे स्मारक निर्मीतीच्या कामाबाबत खालील कामे अंतर्भुत आहे.

| | |
|---|---|
| अ) ओपन थिएटर व स्थापत्य कामे | रु. 90,02,175/— |
| ब) सौंदर्यीकरण व अन्य स्थापत्य कामे | रु. 09,00,000/— |
| क) विद्युत ठरावक कामे | रु. 10,00,000/— |
| ड) लॅन्डस्केप | रु. 04,66,760/— |
| इ) प्रकल्प व्यवस्थापक फी | रु. 03,80,560/— |
| एकूण | रु. 1,17,49,495/— |

या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. लेटस् बील्ड यांना म.न.पा. च्या मंजूर दरानुसार नियुक्त करुन त्यांना रु. 3,80,560/— सेवा शुल्कास मंजूरी प्रदान करणे तसेच वरील प्रमाणे एकूण रु. 1,17,49,495/— राशीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेवून रितसर निविदा काढण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 402** :— जुना भंडारा रोड मेयो हॉस्पीटल ते शहीद चौक पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या रु. 4,03,26,039/— राशी पर्यंत काम करण्यास स्थायी समिती ठराव क्र. 114 दि. 31/8/2009 अन्वये मान्यता प्राप्त होवून मे. आर.एम. दयारामानी यांचे कडून कामास सुरुवात करण्यात आली व त्यापैकी रु. 3,13,39,704/— चे काम करण्यात आले. रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे इमारत धारकांनी उच्च न्यायालयात याचीका दाखल केली. रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे बांधकाम न काढता उपलब्ध जागेत रस्ता बांधकाम करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे. त्यामुळे उर्वरित काम करण्यास वाव नाही. म्हणून शिल्लक रक्कमेतून गोळीबार चौक ते लाल इमली ते अग्रेसन चौकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाच्या रु. 91,70,777/— चे प्राकलनास तांत्रिक मान्यता प्राप्त आहे व हे काम करण्यास मा. निगम आयुक्त यांची मंजूरी प्राप्त आहे. जुन्याच मंजूर निविदा दरावर काम करण्यास कंत्राटदार मे. आर.एम. दयारामानी तयार आहे.

करिता गोळीबार चौक ते लाल इमली ते अग्रेसन चौक पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाच्या रु. 91,70,777/— च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेवून मुळ कामातील निम्मतम निविदाकार मे. आर.एम. दयारामानी यांना

प्राकलयीन दरापेक्षा 4.30 टक्के कमी दराने रु. 87,76,434/– चे कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री हजारे :– मा.अध्यक्ष महोदय, मी मागच्या मिटींगमध्ये म्हटले होते कि माझया प्रभागात शाळेच्या जवळ मोठे खडडे पडलेले आहे, जेटप्रेशर मशीन बोलावुन ते दुरूस्त करण्यांत यावे, त्या शाळेच्या जवळ दोन लहान मुले त्या खडडयात पडले आहे, पोलिस चौकीच्या समोर हायवे रोडवर मराठी प्राथमिक शाळा आहे, त्याठिकाणचे खडडे त्वरीत बुजविण्यांत यावे.

अध्यक्ष :– झोनमधुन ते खडडे बुजविण्याचे काम होत असेल तर त्याप्रमाणे झोननी कार्यवाही करावी नाही तर हॉट.मिक्स.प्लॉट कडुन खडडे बुजविण्यांत यावे.

श्रीमती कोंबाडे :– मा.अध्यक्ष महोदय, प्रभाग 49 हनुमाननगर ते मेडिकल रोडवर एक शांतीनिकेतन शाळा आहे, या शाळेपासुन मेडिकल चौकापर्यंत एम.एस.ई.बी.ने पुर्ण फुटपाथ खोदुन ठेवलेले आहे, त्याठिकाणी केबल टाकण्याचे काम सुरू आहे, परंतु रेस्टोरेशन त्या रोडचे आतापर्यंत झालेले नाही, बैद्यनाथ चौकामध्ये उंटखान्यामध्ये प्रवेश करतांना मोठे खडडे पडलेले आहे ते त्वरीत बुजविण्यांत यावे.

श्रीमती अलका दलाल :– मा.अध्यक्ष महोदय, मागच्या सभेत मी फॉगिंग मशीनच्या संदर्भात बोलले होते परंतु आतापर्यंत माझया प्रभागात फॉगिंग मशीन देण्यांत आली नाही. शांतीनगर झोन अंतर्गत प्रभागात साफ–सफाईच्या कामाकरिता चोकेज गाडया नाही, त्या झोनला त्वरीत चोकेज गाडी देण्यांत यावी.

श्री हजारे :– मा.अध्यक्ष महोदय, माझया प्रभागामध्ये पुर्ण अनधिकृत लेआउट आहे, त्याठिकाणी असलेले खडडे बुजविण्याकरिता आम्हाला 15–15 दिवस गाडी मिळत नाही.

अध्यक्ष :– खडडे बुजविण्याच्या गाडी खरेदीकरिता नवीन प्रस्ताव विभागानी पाठविला पाहिजे.

श्रीमती अलका दलाल :–मा.अध्यक्ष महोदय, आपण मागच्या मिटींगमध्ये चुंगी विभागाकरिता स्कॅनिंग मशीन खरेदी करण्याचा विषय घेतला होता, त्याचे काय झाले. त्याचबरोबर नागपूर शहरात सन 2007 ते 2012 किती रस्त्यांचे डांबरीकरण झाले व किती रस्त्यांचे सिमेंटीकरण झाले, एरीया वाईज जे काम झाले आहे त्याचे माहिती पुढच्या सभेत सादर करण्यांत यावी.

अध्यक्ष :– मा.सदस्यांनी रस्त्यांच्या संदर्भात जी माहिती मागितली आहे, डांबरीकरण व सिमेंटीकरणाच्या रस्त्याबाबत झालेल्या कामाची माहिती मा.सदस्यांना पुढच्या सभेत सादर करण्यांत यावी.

ठराव क्रमांक :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत येते.

**<u>ठराव क्रमांक 403</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर